**<u>फिनोलेक्स ॲकॅडमी ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड टेक्नॉलॉजीमध्ये 'रक्तदान शिबिर' संपन्न</u>**

दरवर्षीप्रमाणे यंदाही फिनोलेक्स ॲकॅडमीमध्ये दि. ०८ सप्टेंबर २०१५ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिर हे फिनोलेक्स ॲकॅडमी ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड टेक्नॉलॉजी, सिव्हिल हॉस्पिटल - रत्नागिरी, वालावलकर हॉस्पिटल - डेरवण आणि रेड क्रॉस - रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. फिनोलेक्स ॲकॅडमी तर्फे अनेक समाज उपयोगी कार्यक्रम राबवले जातात.त्यापैकी रक्तदान शिबिर हा एक उपक्रम आहे. प्रतिवर्षी दोनवेळा रक्तदान केले जाते व मोठया प्रमाणावर यात विद्यार्थी विद्यार्थींनी सहभाग घेतात.

यावेळी सुमारे १५५ बॅग (रेड क्रॉस ३३, सिव्हिल हॉस्पिटल ८२, वालावलकर हॉस्पिटल ४० बॅग) रक्त जमा करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्धाटन फिनोलेक्स ॲकॅडमीचे प्रभारी प्राचार्य डॉ. शशिकांत गोईलकर यांनी केले. यावेळी त्यांनी थोडक्यात रक्तदानाचे महत्व सांगून विद्यार्थ्यांच्या स्तुत्य उपक्रमाबद्दल कौतुक केले. यावेळी सिव्हिल हॉस्पिटल - रत्नागिरी, वालावलकर हॉस्पिटल - डेरवण आणि रेड क्रॉस - रत्नागिरी यांचे टेक्नीशियन तसेच फिनोलेक्स ॲकॅडमीचे सर्व विभागप्रमुख, शिक्षकवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रक्तदान शिबिर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रा. मिलिंद तगारे, प्रा सागर कदम, प्रा. सौ. बोडस, प्रा. कु. बंडागळे, प्रा. साईदीप भोसले, प्रा. सुतार व सर्व विद्यार्थी संघटनांचे प्रतिनिधी यांनी विशेष परिश्रम घेतले.